**अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी**
**घरकुल योजना...**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्र.बीसीएच -२००८/प्र.क्र.३६/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ नोव्हेंबर, २००८

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ९.६८ कोटी इतकी असून त्यामध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या ९८.६२ लाख इतकी आहे. अनुसूचित जातीची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या १०.२% इतकी आहे. त्यापैकी ६०% ग्रामिण व ४०% शहरी लोकसंख्या आहे. राज्यामध्ये अनुसूचित जातीच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासासाठी विविध योजना राबविल्या जातात. तसेच या योजनांसाठी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूदही उपलब्ध करुन दिली जाते.

ग्रामीण व शहरी भागातील लोकांसाठी ग्रामविकास विभाग व गृहनिर्माण विभागामार्फत गृहनिर्माणाच्या योजना राबविल्या जातात. या योजना मुख्यत: दारिद्रय रेषेखालील लोकांकरीता राबविल्या जातात. अनुसूचित जातींच्या व्यक्तीसाठी वैयक्तिक घरकुलाची योजना या विभागामार्फत अद्याप राबविली जात नाही. अनुसूचित जातीचे लोक ज्याठिकाणी राहतात त्या वस्तीला **"दलित वस्ती"** असे संबोधले जाते. ग्रामीण व शहरी दलित वस्तीच्या सुधारणेसाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो. या निधीमधून दलित वस्तीमधील अंतर्गत रस्ते, पिण्याचे पाणी, समाजमंदिर, गटारे दुरुस्ती इत्यादी कामे घेतली जातात. त्यामुळे दलित वस्तीची सुधारणा होत आहे. तथापि ग्रामीण भागातील दलित वस्तीतील लोक मुख्यत: कच्च्या व कुडाच्या घरामध्ये व शहरी भागातील लोक झोपडपट्टीमध्ये रहात आहेत.

अनुसूचित जातीच्या व्यक्तींना त्यांच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे स्वत:च्या उत्पन्नातून चांगल्या प्रकारचे पक्के घर बांधणे शक्य होत नाही. ग्रामीण भागामध्ये बहुतांशी अनुसूचित जातीचे लोक हे कच्च्या घरामध्ये राहतात. आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना पक्के घर बांधणे शक्य होत नाही. तसेच नोकरीसाठी ग्रामीण भागातील बहुतांशी लोक शहराकडे आलेले आहेत. शहरामधील वाढत्या किंमतीमुळे तेथे ते स्वत:चे घर घेऊ शकत नाही. पर्यायाने त्यांना झोपडपट्टीमध्ये राहावे लागते. ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जातीच्या लोकांचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवा-याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घरांच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी ग्रामीण व शहरी भागात घरकुल देण्याच्या योजनेस शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेची व्याप्ती, अटी व शर्ती **परिशिष्ट "अ"** येथे, बांधकाम प्राधिकरण व कार्यवाही **परिशिष्ट "ब"** येथे, अर्जाचा नमुना **परिशिष्ट "क"** येथे दिलेला आहे. घराचा आदर्श नमुना व सविस्तर अंदाजपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

२. सदर योजनेसाठी येणारा खर्च अनुसूचित जाती उपयोजनेतून भागविण्यात येईल.

३. हे आदेश नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग आ वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३४५/२००८ व्यय-१४ दि.१७.९.२००८ अन्वये निर्गमित करण्य येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्या संगणक क्रमांक २००८१११५१७२८३०००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( एन.आरुमुगम )**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
मा.राज्यपाल यांचे कार्यालय
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक
अप्पर मुख्य सचिव, नगरविकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव (ग्रामविकास), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्रविकास प्राधिकरण,बांद्रा कुर्ला संकुल,मुंबई
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,वांद्रे (पू
वत्त विभाग (व्यय-१४/अर्थोपाय,) मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व समाजकल्याण अधिकारी,गट-अ, जि.प.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
सर्व कार्यासने, सा.न्या.व वि.सहाय्य विभाग, मंत्रालय
निवड नस्ती-मावक-२.

ग आणि
करण्यात

त्याचा

शासन निर्णय क्रमांक बीसीएच-२००८/प्र.क्र.३६/मावक-२ दि. १५ नोव्हेंबर, २००८

**परिशिष्ट "अ"**

## योजनेच्या अटी व शर्ती

**१. योजनेचे स्वरुप:-** ग्रामपंचायत, नगरपालिका क्षेत्र व महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द व्यक्तींना पक्की घरे बांधून देण्यात येतील. तसेच शासकीय अभिकरणामार्फत घर खरेदीस या शासन निर्णयाद्वारे विहित घर किंमत मर्यादेत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

**२. घराची किंमत मर्यादा:-** घराच्या बांधकामासाठी क्षेत्रनिहाय कमाल खर्चाची मर्यादा पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| अ) ग्रामीण क्षेत्र | रु.१,००,०००/- |
| ब) नगरपालिका क्षेत्र | रु.१,५०,०००/- |
| क) महानगरपालिका क्षेत्र | रु.२,००,०००/- |

**३. लाभार्थी हिस्सा:-**

| | |
|---|---|
| अ) ग्रामीण क्षेत्र | ५ टक्के |
| ब) नगरपालिका क्षेत्र | ७.५ टक्के |
| क) महानगरपालिका क्षेत्र | १० टक्के |

**टिप :- १. ग्रामीण भागात दारिद्रय रेषेखालील कुटूंबाला लाभार्थी हिस्सा भरण्याची आवश्यकता नाही.**

**२. लाभार्थी हिस्सा, संबंधीत विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी लाभार्थी निवडीनंतर लाभार्थीकडून घेऊन विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्या नांवाने राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून त्यात जमा करावा. त्यानंतर शासनाच्या आदेशानुसार सदर रक्कम संबंधित बांधकाम यंत्रणेला देण्यात येईल.**

**३. वरील मुद्दा क्र.२ प्रमाणे कोणत्याही परिस्थितीत लाभार्थ्याने हिस्सा भरल्याशिवाय बांधकाम सुरु करु नये.**

**४. घराचे क्षेत्रफळ:-** घराच्या बांधकामाचे चटई क्षेत्र २६९ चौ.फूट राहील.

**टिप :- शहरी भागामध्ये इतर विभागाच्या गृहनिर्माण योजनेप्रमाणे या योजनेसाठी देखील ४ पर्यंत चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I.) मंजूर करण्यात येईल.**

**५. अ) पात्रता:-**

१) लाभार्थी अनुसूचित जातीचा असावा.

२) लाभार्थ्याचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षे असावे.

३) अर्जदाराच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा पुढीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| अ) ग्रामीण क्षेत्र | रु.१.०० लाख |
| ब) नगरपालिका क्षेत्र | रु.१.५० लाख |
| क) महानगरपालिका क्षेत्र | रु.२.०० लाख |

४) शक्यतो लाभार्थ्याची स्वत:ची जागा असावी अथवा त्याचे स्वत:चे कच्चे घर असलेल्या ठिकाणी घर बांधण्यात येईल.

५) सदर योजनेचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीस देण्यात येईल.

६) जमीन कमी उपलब्ध असेल तर त्या ठिकाणचे सर्व पात्र इच्छूक लाभार्थी मिळून (२ पेक्षा जास्त) एकत्रित बांधकाम (ग्रुप हाऊसिंग) करता येईल.

७) शासनाच्या इतर गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

८. अनुदा... वितरण:-

**ब) आवश्यक कागदपत्रे:-**

१) रेशन कार्ड / निवडणूक मतदार ओळखपत्र / विद्युत देयक
२) जमीन ताबापत्र पुरावा (७/१२ उतारा / मालमत्ता नोंदणी प्रमाणपत्र)
३) सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र
४) सक्षम प्राधिका-याने दिलेलो उत्पन्नाचा दाखला
५) इतर अन्य पुरावा

**टिप :- जमिनीच्या मालकी हक्काबाबतचा पुरावा ( ७/१२ उतारा / पी.आर.कार्ड) नसेल तर, रेशनकार्ड / निवडणुक मतदार ओळखपत्र / विदयुत देयक ग्राह्य धरता येईल.**

**६. प्राधान्य क्षेत्र:-**

घरे बाधतांना खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम देण्यात येईल.
अ) जातीय दंगलीमध्ये घराचे नुकसान (आगीमुळे व इतर तोडफोड) झालेली व्यक्ती.
ब) ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार पिडित झालेल्या अनुसूचित जातीच्या पात्र व्यक्ती.
क) पुरग्रस्त क्षेत्र
ड) विधवा महिला.
इ) उर्वरित सर्व क्षेत्र.

**टिप:- ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रांमध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या अधिक असलेल्या ठिकाणी प्राधान्य देण्यात येईल.**

**७. लाभार्थी निवड:-**

अ) सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी स्थानिक वृत्तपत्रात तसेच स्थानिक प्रसिध्दी माध्यमाद्वारे या योजनेला व्यापक प्रसिध्दी देतील.

ब) प्रसिध्दीनंतर परिशिष्ट - क मध्ये असलेल्या विहित नमून्यात अर्ज मागवून घेतील. (अर्जाचा नमूना परिशिष्ट-क येथे जोडला आहे) सदर अर्ज झेरॉक्स, टंकलिखित किंवा हस्तलिखित स्वरुपात संबंधित जिल्हयाच्या विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे करता येईल. प्रत्येक विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी अर्जाचा नमुना आपल्या कार्यालयाबाहेरील नोटीस बोर्डावर लावावा.

क) अर्ज स्विकारताना विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्या कार्यालयाने प्रत्येक अर्जावर अनुक्रमांक १, २, ३ असे ठळकपणे नमूद करावे. त्याप्रमाणे नोंदवही ठेवावी. अर्जदारांना अर्ज स्वीकृत केल्यांनतर पोच द्यावी.

ड) विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी सर्व अर्जांची छाननी करुन वरील परिच्छेद ५ अ मधील पात्रतेचे निकष पूर्ण करणा-या पात्र लाभार्थ्यांची निवड यादी तयार करावी. सदर निवड यादी विभागीय समाजकल्याण अधिकारी यांच्यामार्फत संचालक, समाजकल्याण,पुणे यांच्याकडे पाठवावी.

इ) संचालक, समाजकल्याण यांनी प्रत्येक जिल्हयातून आलेल्या अर्जाची परिशिष्ट-अ, परिच्छेद ६ येथे दिलेल्या प्राधान्य क्षेत्रानुसार लाभार्थींची जिल्हानिहाय यादी तयार करावी व सदर यादी शासनाकडे पाठवावी. सदर यादीस शासनाची अंतिम मंजूरी मिळवावी.

ई) एखादया विशिष्ट आपत्कालीन परिस्थितीत विहित अटी, शर्ती पूर्ण करत असलेल्या आणि तात्काळ घर उपलब्ध करण्याची नितांत आवश्यकता आहे अशा अर्जदाराने शासनाकडे अर्ज केल्यास त्यास खास बाब म्हणून केव्हाही घर मंजूर करण्याचे अधिकार शासनास राहतील.

| | |
|---|---|
| ८. अनुदान वितरण:- | आवश्यक असणारे अनुदान अर्थसंकल्पिय उपलब्धतेनुसार संबंधित यंत्रणेला टप्याटप्याने देण्यात येईल. |
| ९. पर्यवेक्षण:- | सदर बांधकामाचे पर्यवेक्षण संबंधीत बांधकाम प्राधिकरणाने करावयाचे आहे. ग्रामीण भागामध्ये खाजगी विकासकामार्फत बांधकाम केल्यास त्याचे पर्यवेक्षण जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा / महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण / शासकीय - निमशासकीय संस्थेच्या अभियंत्याकडून करता येईल. पर्यवेक्षणासाठी लागणारा खर्च संबंधीत यंत्रणेला उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| १०. अंमलबजावणी आणि आहरण व संवितरण अधिकारी:- | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी हे आंहरण व संवितरण अधिकारी राहतील व नियंत्रक अधिकारी म्हणून संचालक, समाजकल्याण, पुणे हे राहतील. |
| ११ अनुदान वितरण पध्दती | अ) संबंधित बांधकाम यंत्रणेला खालील टप्प्यात अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.<br>१) घराचे बांधकाम सुरु करताना ........५० टक्के<br>२) वरील निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर ...४० टक्के<br>३) घराचा ताबा घेताना संपूर्ण तपासणी करुन ...१० टक्के |
| १२. समन्वय: | सदर योजनेचे समन्वय सचिव, सामाजिक न्याय, सचिव नगर विकास, सचिव गृह निर्माण व सचिव ग्रामविकास विभाग यांची समिती करेल. सदर समिती सामाजिक न्याय विभागाला अहवाल सादर करील. |

## परिशिष्ट-ब

### बांधकाम प्राधिकरण व कार्यपध्दती -

**१) ग्रामिण क्षेत्र** : ग्रामिण भागामध्ये खालील यंत्रणांमार्फत घराचे बांधकाम करता येईल.

अ) **जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा** : सदर यंत्रणेमार्फत ग्रामिण भागातील अनुसूचित जातीच्या व्यक्तींच्या जागेवर घराचे बांधकाम करुन घेता येईल. सदर यंत्रणेला घराच्या बांधकामाच्या आवश्यकतेनुसार व शासन निर्णयातील अटी , शर्तीनुसार बांधकाम अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

ब) **महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा)** : सदर यंत्रणा ग्रामिण भागात घरांचे बांधकाम करण्यास तयार असल्यास सदर यंत्रणेमार्फत बांधकाम करुन घेता येईल.

क) **खाजगी विकासक** : वरील दोन्ही बांधकाम यंत्रणा ग्रामिण भागात घराचे बांधकाम करण्यास तयार नसल्यास सामाजिक न्याय विभागाने निश्चित केलेला घराचा आदर्श नमूना ( मॉडेल प्लॅन) प्रमाणे घरांचे बांधकाम करण्यासाठी खाजगी विकासकांकडून निविदा मागविण्यात येतील. संचालक, समाजकल्याण, पुणे यांनी निविदा मागवून बांधकाम एजन्सी निश्चित करावी. निवड करण्यात आलेल्या संबंधित विकासकास बांधकामाच्या आवश्यकतेनुसार शासन निर्णयान्वये विहित घराच्या किंमत मर्यादेत तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल.

खाजगी विकासकामार्फत करण्यात येणाऱ्या घराच्या बांधकामाचे पर्यवेक्षण जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा / महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण / शासकीय - निमशासकीय संस्थेच्या अभियंत्याकडून करता येईल. त्यासाठी लागणारा खर्च संबंधित पर्यवेक्षण यंत्रणेला उपलब्ध करुन देण्यात येईल.

**२) नगरपालिका / महानगरपालिका क्षेत्र** : सदर क्षेत्रामध्ये अनुसूचित जातीच्या व्यक्तींच्या स्वमालकीच्या जागेवर सामाजिक न्याय विभागाने निश्चित केलेल्या घराच्या आदर्श नमुन्याप्रमाणे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामार्फत घराचे बांधकाम करण्यात येईल. सदर यंत्रणेस त्यासाठी आवश्यक निधी शासन निर्णयात विहित केलेल्या घराच्या किंमत मर्यादेत उपलब्ध करुन देण्यात येईल.

**३) मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्र** : सदर क्षेत्रामध्ये अनुसूचित जातीच्या व्यक्तींच्या स्वमालकीच्या जागेवर सामाजिक न्याय विभागाने निश्चित केलेल्या घराच्या आदर्श नमुन्याप्रमाणे मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामार्फत घराचे बांधकाम करण्यात येईल. सदर यंत्रणांस त्यासाठी आवश्यक निधी शासन निर्णयात विहित केलेल्या घराच्या किंमत मर्यादेत उपलब्ध करुन देण्यात येईल.

**४)** अनुसूचित जातीची पात्र व्यक्ती शासकीय प्राधिकरणाकडून (उदा.म्हाडा, सिडको, एमएमआरडीए ) घर विकत घेणार असल्यास त्याबाबतचे मंजूरी आदेश, घराची रक्कम संबंधित शासकीय प्राधिकरणाकडे जमा केल्याची पावती सादर केल्यास पात्रतेनुसार शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेले घराचे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

५) या योजनेचा मुख्य उद्देश अनुसूचित जातीच्या व्यक्तीचे कच्च्या घराऐवजी पक्के घर बांधून देणे असा आहे. परंतु काही विशिष्ट प्रकरणी म्हाडा, सिडको, एमएमआरडीए किंवा नागरी कमाल जमीन धारणा मधील (शासनाच्या ५ टक्के कोट्यातून) व इतर कोणत्याही शासकीय कोट्यातून घर मंजूर झाल्यास त्यांचा सुध्दा या योजनेमध्ये समावेश करण्यात येईल. तथापि हे मंजूर करण्यापूर्वी त्यांचेकडे घर आहे किंवा नाही याबाबत स्वतंत्रपणे चौकशी करण्यात येईल. तसेच सदर घराचे वाटप करताना घराची किंमत पात्र रकमेपेक्षा जास्त असेल तर घराचे वाटप करताना त्यांना सदर घरासाठी अधिक लागणा-या रकमेसाठी लाभार्थ्याकडून रक्कम भरल्याचा पुरावा अथवा बँकेतून कर्ज मंजूर झाल्याबाबतचे पत्र सादर करणे आवश्यक आहे. **सदर घराची संयुक्त मालकी संबंधित व्यक्ती व सामाजिक न्याय विभागाची राहील व त्यांना शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील.**

६) अ) लाभार्थींचे अर्ज मंजूर झाल्यानंतर अस्तित्वातील घर तोडून नवीन घराचे बांधकाम करण्यापूर्वी घराची पहाणी करुन कच्च्या घराचा लाभार्थ्यासोबत फोटो घेण्यात यावा. सदर कार्यवाही सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी / कर्मचाऱ्याने (वर्ग-३ पेक्षा कमी दर्जाचा नसावा) करावी.

ब) घर पूर्ण झाल्यानंतर त्या घरावर सामाजिक न्याय विभागाच्या अर्थसहाय्यातून घर बांधण्यात आले, असे स्पष्ट नांव व साल असलेली कोरीव कोनशीला तयार करुन बसवावी. बिल्डींग फ्लॅटमध्येही प्रवेशद्वारावर सामाजिक न्याय विभागाच्या अर्थसहाय्यातून घर बांधण्यात आले, असा नामफलक लावण्यात यावा.

क) घराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यासोबत घराचा फोटो घेण्यात यावा.

ड) वरील अ, ब, व क साठी येणारा खर्च घराच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

इ) कच्च्या घराचे बांधकाम पाडून पक्के घराचे बांधकाम करण्यासाठी लागणा-या कालावधीमध्ये लाभार्थीना स्वत: राहण्याची व्यवस्था करावी.

७) **बांधकामाची तपासणी :-** लाभार्थी निवडल्यानंतर बांधकाम सुरु झाल्यानंतर बांधकाम व्यवस्थित चालु आहे का, लाभार्थींचे घराचे बांधकाम चालू आहे या कडे लक्ष आहे का, बांधकामाचा दर्जा चांगला आहे का, याबाबींची तपासणी करण्यासाठी संचालक पुणे यांनी जिल्हा निहाय पथक तयार करावे. एका जिल्हयातील पथकाकडून दुस-या जिल्हयातील बांधकामाची पाहणी करण्यात यावी. संचालक स्तरावर काही प्रकरणी बांधकामाची तपासणी करावी तसेच शासन स्तरावरुन सुध्दा काही बांधकामाची तपासणी करण्यात येईल.

८) **घराची नोंदणी :-** अ) घराची नोंदणी पती पत्नीच्या संयुक्त नावाने केले जाईल. लाभार्थ्यास घर विकता येणार नाही. विकल्यास शासनामार्फत घरावर जप्ती आणण्यात येईल. तथापि रक्ताच्या नातेवाईकांना हस्तांतरीत करावयाचे असल्यास त्यास सामाजिक न्याय विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

ब) घराचे लाभार्थी निवड, घराचे मॉडेल, बांधकाम पध्दत इत्यादीबाबत वाद निर्माण झाल्यास अथवा काही अडचणी आल्यास त्याबाबतचा सामाजिक न्याय विभागाचा निर्णय अंतिम राहील.

क) घराचे वाटप अंतिमत: सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात येईल.

अर्जाचा अनुक्रमांक:-

परिशिष्ट-क

फोटो

## अनुसूचित जातीच्या व्यक्तींना वैयक्तीक घरकुलासाठी अर्ज

१) अर्जदाराचे नांव :

२) वडिलांचे संपूर्ण नांव :
पतीचे नांव (महिलांसाठी)

३) अ) कायमचा पत्ता

ब) सध्याचा पत्ता :

४) अर्जदारास घरकुल बांधावयाचे आहे :
जागेचा पत्ता.

५) घरकुल बांधावयाच्या जागेचा तपशिल :
क्षेत्रफळ इ.
(सदर जागा स्वमालकीची असल्याबाबतचा
तपशिल.)

६) अर्जदाराची जन्मतारीख व वय :

७) जन्मस्थळ :

८) जात व पोटजात :

९) शिक्षण :

१०) अर्जदाराचा व्यवसाय :

११) रेशनकार्ड क्रमांक :

१२) अर्जदाराच्या वडिलांचा व्यवसाय :
पतीचा व्यवसाय (महिलांबाबत)

१३) कुटुंबातील मिळवत्या व्यक्तीचे :
वार्षिक उत्पन्न.

१४) प्राधान्य क्षेत्रातील क्षेत्र :
(आवश्यक तेथे ✓ करावे)

अ) जातीय दंगलीमध्ये घराचे नुकसान (आगीमुळे व इतर तोडफोड) झालेली व्यक्ती.

ब) अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार पिडित झालेल्या अनुसूचित जातीच्या पात्र व्यक्ती.

क) पुरग्रस्त क्षेत्र

ड) विधवा महिला.

इ) इतर

१५) **प्रतिज्ञापत्र**

:

मी प्रतिज्ञेवर असे लिहून देतो की, वरील सर्व माहिती सत्य आहे. माझ्या मालकीचे अन्यत्र कोठेही पक्के घर नाही. शासकीय अनुदानातून माझ्या जागेवर बांधण्यात आलेले घराचा मी स्वतः वापर करेन, इतरांना भाडयाने देणार नाही. सदर घर मी इतरांना हस्तांतरित अथवा विकणार नाही, असे घडल्यास शासन सदर घर परत घेऊ शकेल व त्यास माझी संमती आहे.

**दिनांक** **अर्जदाराची सही किंवा अंगठयाचा ठसा**

**अर्जदाराचे नांव-**

**टिप :- अर्जदारास विहित नमुन्यातील अर्ज झेरॉक्स, टंकलिखित किंवा हस्तलिखित स्वरुपात करता येईल.**

---

( कार्यालयीन उपयोगासाठी )

१) अर्जदाराने दिलेली माहिती व कागदपत्रे छाननीअंती बरोबर असल्याचे आढळून येते.

२) प्रथम येईल त्यास प्रथम या तत्वावर अर्जदाराच्या अर्जाचा अनुक्रमांक हा असल्याने व प्राधान्य क्षेत्रातील या क्षेत्रात मोडत असल्याने वैयक्तीक घरकुलासाठी पात्र ठरविण्यात येत आहे.

**विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी** **विभागीय समाजकल्याण अधिकारी**

**दिनांक :**

---

**<u>अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे -</u>**

१) सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला अर्जदाराचा जातीचा दाखला.

२) उत्पन्नाचा सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला दाखला.

३) रेशनकार्ड साक्षांकित छायाप्रत.

४) अर्जदार ज्या जागेत घर बांधणार आहे ती जागा स्वमालकीची असल्याबाबत ७/१२ उतारा किंवा मालमत्ता नोंदणीपत्र (पी.आर.कार्ड) ची साक्षांकित प्रत किंवा विदयुत देयक, निवडणुक मतदार ओळखपत्र.

५) इतर शासकीय योजनांतर्गत मिळालेले ओळखपत्र, दारिदय रेषेखालील कार्ड.

*********